# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


## विशेष वार्तापत्र

जा.क्र ३८५/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०७/२०१८

## फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेचा प्रतिसाद वाढला शेतीच्या हंगामातही फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेची उपस्थिती

**भंडारा:–** जिल्हयात मा. पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात दिनांक २८/०७/२०१८ रोजी जिल्हयात ठिकठिकाणी फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आले होते. यामध्ये पोलीस स्टेशन आंधळगांव अंतर्गत ग्राम धोप येथे फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन करण्यात आले त्यामध्ये सपोनि. कमलेश सोनटक्के सोबत ४ कर्म यांनी जनतेस मार्गदर्शन केले यावेळी अर्जदार संजविद यशंवत श्री वाहाणे वय ५५ वर्षे यांनी गैरअर्जदार कपुरचंद जयकिशन गेडाम वय ५२ वर्षे रा. धोप यांचेविरूध्द अर्जदाराचे भिंतीला लागुन असलेल्या जागेत अतिक्रमण केल्याची तक्रार केली होती. तंटामुक्ती समितीच्या माध्यमातुन सदर तक्रार तेथेच सोडविण्यात आली यावर लगेच तातडीने तक्रार निवारण झाल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांनी समाधान व्यक्त केले. पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत बेटाळा येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. त्यामध्ये पो.स्टे. चे पोउपनि. रूषी चाबुस्कवार व ३ कर्म. यांनी लोकांच्या तक्रारी समजुन घेतल्या व त्यांना मोबाईल फोनवर एटीएम बंद पडल्याचे सांगुन कशा पध्दतीने फसवणुक केली जाते याबाबत मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन साकोली अंतर्गत मालुटोला येथे फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आला होता त्यामध्ये नक्षलवादी शासनाविरूध्द जनतेला कशाप्रकारे भडकवतात व त्याच्या आमिषाला बळी न पडता पोलीसांना सहकार्य करण्याबाबत मार्गदर्शन केले तेथे ८० स्त्री, पुरूष हजर होते पोलीस स्टेशन पालांदुर अंतर्गत ग्राम किटाळी येथे फिरते पोलीस स्टेशन आयोजीत केले होते. ठाणेदार अंबादास सुणगार व २ कर्म.नी लोकांच्या तक्रारी समजुन घेतल्या व त्यांना गावातील लहान मोठे वाद, तंटे गावातच फिरत्या पोलीस स्टेशनच्या माध्यमातुन सोडविण्याचे आवाहन केले त्यावेळी ८५ स्त्री, पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन मोहाडी अंतर्गत ग्राम कुशारी येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये महिलांवर होणारे अत्याचार बाबत मार्गदर्शन केले तसेच गावामध्ये पावसाळयाचे दिवसात निर्माण होणा–या पुरस्थिती बाबत माहीती देण्यात आली. व अशी परिस्थीती उदभवल्यास लगेच पोलीस स्टेशनला फोन करून माहीती देण्याबाबत सुचना देण्यात

आल्या अंधश्रध्दा व जादुटोण्याला बळी न पडुन गावात वाद निर्माण होत असल्यास त्यांना त्वरीत पो.स्टे.ला घेवुन यावे. किंवा कळवावे. बॅक खाते क्रमांक,आधार कार्ड क्रमांक कोणालाही सांगु नये अनोळखी व्यक्ती फेरीवाले आल्यास त्यांची योग्य विचारपुस करावी त्यांना चोर, समजुन किंवा मुले पळवणारे टोळी समजुन मारहाण करू नये, मारू नये संशय आल्यास पोलीस स्टेशनला माहीती दयावी त्यांना पोलीसांचे स्वाधीन करावे. पोलीस स्टेशन अडयाळ अंतर्गत ग्राम चकारा येथे फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पोउपनि. नितीन दांदळे व ३ कर्म यांनी जनतेला संशयीत इसम आढळल्यास त्वरीत पो.स्टे.ला कळवावे. त्याला मारपीट करू नये किडणी चोर, अश्या अफवांवर विश्वास ठेवु नये एटीएम आधार नंबर कोणत्याही अनोळखी इसमास सांगु नये त्यामुळे होणारी फसवणुक इत्यादी बाबत माहीती दिली. त्यात ४० स्त्री, पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन वरठी अंतर्गत ग्राम सोनुली येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. त्यात पोउपनि. कारंडे व २ कर्म यांनी ऑनलाईलन फ्रॉड, पोलीसांच्या ऑनलाईन सुविधांबाबत तसेच किडनी चोर, गावातील अडीअडचणी गावातच सोडविण्याबाबत माहीती दिली. त्यामध्ये १२ स्त्री, पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन कारधा अंतर्गत ग्राम कोकणागड येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ४ कर्म. यांनी गावातील छोटे तंटे गावातच निपटारा होणेबाबत, तसेच बॅकींग फसवणुक, ध्वनी प्रदुषन, प्रोजेक्टरच्या माध्यमातुन चित्रपट दाखवुन जनजागृती निर्माण करण्यात आली. त्यामध्ये ५० स्त्री, पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन करडी अंतर्गत ग्राम पालोरा येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये ठाणेदार कोयंडे व ३ पोलीस कर्म. नी सिटीजन पोर्टल अॅप्स, ऑनलाईन तक्रार, ग्रामसुरक्षा दल स्थापन करण्याबाबत माहीती देण्यात आली. त्यामध्ये २५ स्त्री, पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन भंडारा अंतर्गत ग्राम मुजबी येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये २ पोलीस कर्म. नी बाललैंगीग अत्याचार, एटीएम फ्रॉड, ऑनलाईन फसवणुक, लहाण मुलांना पळवुन नेणारे टोळीबाबत अफवांवर विश्वास ठेवु नये तसेच मुलांना स्पर्धा परिक्षेबाबत मार्गदर्शन केले. त्यामध्ये ५० स्त्री, पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन जवाहरनगर अंतर्गत ग्राम उमरी येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये २ पोलीस कर्म. नी मोबाईल फसवणुकीबाबत, पुर परिस्थीतीबीबत, तसेच मोबाईल अॅप्स बाबत माहीती देण्यात आली. त्यामध्ये २५ स्त्री, पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन लाखांदुर अंतर्गत ग्राम विहीरगांव येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये सपोनि. गेडाम २ पोलीस कर्म. नी सायबर क्राईम, ऑनलाईन फ्रॉड, गावातील तंटे गावातच मिटविणे, ग्रामसुरक्षा दल सक्रिय करणे तसेच महिलांविषयी कायदे बाबत मार्गदर्शन केले. त्यामध्ये २० स्त्री, पुरूष उपस्थित होते.

एकुणच पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांच्या संकल्पनेतुन राबविण्यात येत असलेल्या फिरत्या पोलीस स्टेशन उपक्रमाचे फायदे जनतेच्या लक्षात येत असल्याने रोहणीचा व शेतातील ईतर महत्वाचे कामांचा हंगाम सुरू असुनही लोक मोठया प्रमाणावर फिरत्या पोलीस स्टेशनला हजर राहुन जनतेकडून मोठया प्रमाणावर हजर राहून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे

दिसुन येत आहे. लोक त्याचे तक्रारींचे निवारण करून घेत आहेत. तसेच पोलीसांकडुन मिळणा—या वेगवेगळया सुचनांची माहीती घेत आहेत. त्यामुळे पोलीस व जनता यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण होत असुन जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधीत असल्याचे चित्र दिसत आहे. अधिकाधिक लोकांनी फिरते पोलीस स्टेशन उपक्रमात सहभागी होवुन आपल्या समस्या व तक्रारी सोडवणुन घ्याव्यात विनाकारण न्यायालयापर्यंत नेवु नये आपल्या वेळेची व पैशाची बचत करावी व गावामध्ये शांततेचे व विकासाचे वातावरण निर्माण करावे असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांनी जिल्हा वासीयांना केले.

**(जितेद्रं के आडोळे)**
**पोलीस उपनिरीक्षक**
**जनसंपर्क अधिकारी**
**दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.